वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- शनिवार दि.२५ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# कोणत्या नालायक माय बापाचा हा नीचपणा

## स्वत:च्या पोटातून जन्मलेल्या चिमुकलीला पाण्यात फेकून दिले

### असल्या निचप्रवृत्ती करणाऱ्या हरामखोरांना कठोर शिक्षा झाली पाहिजे

Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता



## नको होती तर कोणाला देवून टाकलेलं बरं झालं असतं

बीड, (दिव्य न्युज):- शहरातून वाहणाऱ्या बिंदुसरेच्या पात्रात आज सकाळी नकोशी स्त्री जातींच्या बाळाचा मृतदेह आढळला आहे. तर तो मृतदेह पूर्ण छिन्नविछिन्न असून बऱ्याच दिवसांपूर्वीचा मृतदेह असल्याने चेहराही राहिला नाही. यामुळे हा मृतदेह पाण्यात वाहून आला की, येथे कोणी फेकला असा प्रश्न निर्माण होत असून या घटनेने मात्र शहरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शहर पोलीस तपास करीत आहेत.

शहरातील खासबाग येथून मोमीनपुरा कडे जाण्यासाठी बिंदुसरा नदीपात्रात बनविण्यात आलेल्या तात्पुत्या पुलाजवळ एका चिमुकलीचा छिन्नविछिन्न अवस्थेत मृतदेह आज शनिवारी (दि.२५) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास आढळून आला. मृतदेह आढळून येताच याची बीड शहर पोलिसांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला. चिमुकलीचा मृतदेह आढळल्याने शहरात खळबळ उडाली असून, हा मृतदेह बऱ्याच दिवसांपूर्वीचा असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. जर बऱ्याच दिसांचा असेल तर चिमुकली हरवल्याची स्थानिकला कुठे तक्रार नाही. तसेच मागे जोरदार पाऊस पडला असून, यावेळी अनेकवेळा नदीला पूर आला होता. यामुळे तलावातून ही फुगून पाण्यात मृतदेह वाहून येऊ शकतो. यामुळे याचा शोध घेणे हे पोलीस प्रशासना समोर मोठे आवाहन मानले जात आहे. तर बालिकेचे फक्त हात, पाय असून चेहरा तर काहीच राहिलेला नाही. यामुळे ओळख पटणे मुश्किल आहे. नेमकं या बाळाला पाण्यात फेकण्यात आले की, तो वाहून आला याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. तर पोलीस याचा तपास करीत असून त्यानंतर हा प्रकार नेमका काय? हे स्पष्ट होईल. यावेळी एपीआय राठोड, पीएसआय वाळके, हवालदार शेवांत, एएसआय उगलमुगले, हवालदार राऊत आदी उपस्थित होते.

### फलटण डॉक्टर प्रकरणाला नवं वळण, बनकरच्या भावाचा आणि बहिणीचा आरोप

# माझ्या भावाला डॉक्टरनेच प्रपोज केला

### गोपाळ बदनेचे शेवटचे लोकेशन पंढरपुरमध्ये, प्रशांत बनकरला पुण्यातून अटक






सातारा, (दिव्य न्युज):- साताऱ्याच्या फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने केलेलं आत्महत्या प्रकरण सध्या राज्यभर गाजत आहे. तरुणीने आपल्या हातावर सुसाईड नोट लिहून आयुष्याचा शेवट केल. तिने पीएसआय गोपाल बदाने आणि प्रशांत बनकर दोघांवर गंभीर आरोप केले. दोघांच्या त्रासाला कंटाळून आपण आयुष्य संपवत असल्याचं देखील तरुणीने नोटमध्ये म्हटलं.

या प्रकरणी आज पहाटे सातारा पोलिसांनी आरोपी प्रशांत बनकरला अटक केली. प्रशांत त्याच्या मित्राच्या फार्म हाऊसवर लपून बसला होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छापेमारी करत प्रशांत बनकरला बेड्या ठोकल्या. या अटकेनंतर आता महिला डॉक्टर मृत्यू प्रकरणात महत्त्वाचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता आहे.

दरम्यान, प्रशांत बनकरच्या कुटुंबीयांनी डॉक्टर महिलेवरच आरोप केले आहेत. महिला डॉक्टर माझ्या भावाला टॉर्चर करत होती. ती ब्लॅकमेल करत होती, तिनेच १५ दिवसांपूर्वी माझ्या भावाला प्रपोज केलं होतं, असा खळबळजनक दावा प्रशांत बनकरच्या बहिणीने केला आहे. शिवाय माझा भाऊ पुण्यात जॉबला असतो, तो अधून मधून घरी येत असतो, त्याचा या प्रकरणाशी काही संबंध नाही, त्याला अडकवलं जात असल्याचं प्रशांतच्या भावाने म्हटलं आहे. या संपूर्ण ▸▸ पान २ वर

### राष्ट्रवादीच्या नेत्यांचा मुख्यमंत्र्यांना फोन

### पीडितेच्या कुटुंबाला फडणवीस म्हणाले, मास्टरमाईंड शोधून काढतो




बीड, (दिव्य न्युज):- सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत महिला डॉक्टरच्या आत्महत्येची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. बीडच्या महिला डॉक्टरच्या पीडित कुटुंबाला भेटण्यासाठी आलेल्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते मोहन जगताप यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन लावून कुटुंबाची मागणी त्यांच्या कानावर घातली.बीडच्या पीडित ▸▸ पान २ वर

## स्व.गोपीनाथ मुंडेंचे वारसदार मुंडे बंधू-भगिणी नाहीत

### भावा-बहिणींनी राजकारण सोडून हुकूमशाही सुरू केली-सारंगी महाजन



मुंबई , (दिव्य न्युज):- महाराष्ट्राच्या राजकारणात गोपीनाथ मुंडेंच्या राजकीय वारसावरून सुरू असलेला वाद आता आणखीनच चिघळला आहे. सुरुवातीला मंत्री छगन भुजबळ यांनी धनंजय मुंडेंनी गोपीनाथ मुंडेंचा राजकीय वारसा पुढे न्यावा, असे विधान केले. यावर तात्काळ प्रतिक्रिया म्हणून, पंकजा मुंडेंचे मामा आणि माजी मनसे नेते प्रकाश महाजन यांनी पंकजा मुंडे याच त्यांच्या वडिलांच्या राजकीय वारसदार असल्याचे स्पष्ट केले. दुसरीकडे, सारंगी महाजन यांनी मुंडे बंधू-भगिनी गोपीनाथ मुंडेंचे वारसदार नसल्याचे म्हटले आहे. त्यांनी आरोप केला की, या बहिण-भावाने लोकशाही राजकारण सोडून हुकूमशाही राजकारण सुरू केले आहे.तसेच, सारंगी महाजन यांनी त्यांची जमीन हडप केल्याचा आरोपही मुंडे बंधू-भगिनींवर केला. बीडच्या जनतेने पाठ फिरवल्यास त्यांना दहा हजार मतेही मिळणार नाहीत, असे सारंगी महाजन यांनी म्हटले. याउलट, पंकजा मुंडेंनी संजय राठोड आणि अर्जुन खोतकर यांना गोपीनाथ मुंडेंचे वारसदार असल्याचे सांगितले आहे. तसेच, मुंडे साहेबांचे खरे वारसदार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

### रोहित पवारांनी आरोप केलेल्या सिडको प्रकरणात ट्विस्ट

# शिरसाटांनी करोडोंची जमीन बिवलकरला दिल्याचा आरोप

### वनविभागानेच केलं कबूल, १४०० कोटींची जमीन



मुंबई, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवारांच्या पक्षाचे आमदार रोहित पवार (ठेहळीं झुरी -श्रश्रशसरींळेपे प ीरपक्षरू डहळीरीं) यांनी सातत्यानं आरोप केलेल्या नवी मुंबईतील सिडको प्रकरणाला आता एक नवीन वळण प्राप्त झालं आहे. कारण खुद्द वन विभागाने पोलीस प्रशासनाला पत्र लिहून या प्रकरणात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचं आणि फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. पाहुयात याबाबतचा एबीपी माझाचा विशेष रिपोर्ट...मंत्री संजय सिरसाट यांनी सिडकोचे अध्यक्ष असताना नवी मुंबईतील यशवंत नारायण बिवलकर या व्यक्तीला करोडो रुपयांची जमीन दिल्याचा गंभीर आरोप आमदार ▸▸ पान २ वर

## कंत्राटदाराकडून डिफेंडर घेणारे २१ आमदार कोण?

### गायकवाडांचा नंबर कितवा?



मुंबई , (दिव्य न्युज):- सुमारे दोन कोटींच्या डिफेंडर गाडीवरून शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर पुन्हा एकदा कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निशाणा साधाला. एक बड्या कंत्राटदाराने २१ आमदारांना गाड्या वाटल्या आहेत. यात गायकवाड यांचा नंबर एकविसावा आहे की बाविसावा हा संशोधनाचा विषय आहे. मात्र याचे उत्तर लवकरच महाराष्ट्राच्या जनतेला मिळणार असल्याचा मोठा गौप्यस्फोट सपकाळ यांनी केला.

आमदार गायकवाड सुमारे दोन ते अडीच कोटी रुपये किंमतीच्या डिफेंडर गाडीतून फिरत होते. एवढी महागडी गाडी त्यांच्याकडे कुठून आली असा प्रश्न ▸▸ पान २ वर

## दोन महिला अधिकारी नळावर भांडतात तशाच भांडल्या

### एकीने दुसरीला कोपराने ढोसलं

मुंबई , (दिव्य न्युज):- नागपूर येथे आयोजित एका सरकारी कार्यक्रमात दोन महिला अधिकाऱ्यांमध्ये सार्वजनिकरित्या धुसफूस झाल्याची घटना समोर आली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत ही बाब उघडकीस आली. पोस्टमास्टर जनरल पदावरून अधिकाऱ्यांमधील हा वाद चव्हाट्यावर आल्याने प्रशासकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

या प्रकरणानुसार, पोस्टमास्टर जनरल शोभा मधाळे यांची ८ सप्टेंबर रोजी कर्नाटक राज्यातील धारवाड येथे बदली झाली आहे. या बदलीनंतर नागपूर पोस्ट विभागाचा प्रभार ▸▸ पान २ वर




## प्रभाग क्रं. २३ च्या मतदारात फक्त अन् फक्त सलामशेठ च्या नावाची चर्चा



### इतर भावी उमेदवारांनी वळविला दुसऱ्या प्रभागात रस्ता



बीड, (दिव्य न्युज):-एमआयएमचे जेष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी खा.इम्तियाज जलील, जिल्हाध्यक्ष ॲड.शेख शफिक भाऊ यांचे विश्वासू आणि भरोसेमंद असलेले ज्यांना संपूर्ण जिल्ह्यात एमआयएमच्या कार्यकर्त्यांनी जेष्ठ नेत्याची पदवी दिली ते सलाम शेठ प्रभाग क्रं२३ मधून एमआयएमकडून उमेदवार असणार आहेत. सलामशेठ यांचे नाव येताच पुन्हा या प्रभागात एमआयएमचा पतंग मागच्या निवडणुकीप्रमाणेच उंच भरारी घेवून विजयश्री प्राप्त करणार आहे.

प्रभाग क्रं. २३ च्या मतदारात फक्त अन् फक्त सलामशेठच्या नावाची जोरदार चर्चा असल्याने इतर भावी उमेदवारांनी वळविला दुसऱ्या प्रभागात रस्ता अशी काहीशी स्थिती या प्रभागात सलामशेठचे नाव येताच पहायला मिळत आहे. सलामशेठ यांनी प्रभागात भेटी गाठीला सुरूवात केली असुन मतदारांकडून त्यांना भरपुर प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र त्यांच्या भेटी गाठीवरून दिसून ▸▸ पान २ वर

### प्रभागात सलामशेठच्या भेटीगाठीला सुरूवात,मिळतोय मतदारांकडून भरपुर प्रतिसाद

# जोपर्यंत रस्ता नाही, तोपर्यंत मत नाही, १५ गावांचा एकमुखी निर्धार

**बीड, (दिव्य न्युज):- बीड-नाळवंडी रस्ता गेल्या २० वर्षांपासून अक्षरशः जीवघेणा ठरला आहे. मोठमोठे खड्डे, डांबराचे अवशेष, चिखलाचे दलदल यामुळे हा रस्ता मृत्यूचा महामार्ग बनला आहे. या दुरवस्थेवर लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या संपूर्ण निष्क्रियतेने संतप्त झालेल्या परिसरातील १५ ते १६ गावांच्या ग्रामस्थांनी जोपर्यंत रस्ता नाही, तोपर्यंत मत नाही या घोषवाक्यासह आगामी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीवर ठाम बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.**

बीड ते नाळवंडी हा तालुक्यातील प्रमुख मार्ग. पण गेल्या दोन दशकांपासून त्याचं डांबर उखडून गेला आहे. चारचाकी वाहन काय, दोनचाकी सुद्धा या मार्गाने चालवणे म्हणजे स्वतःचा जीव धोक्यात घालणे! प्रत्येक पावसाळ्यात हा रस्ता नदीसमान होतो; रुग्णवाहिका गावात पोहोचत नाही, शाळकरी मुलं चिखलात अडकतात, शेतकऱ्यांचा माल खराब होतो. तरीही संबंधित लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य केवळ आश्वासनं देत राहिले, पण प्रत्यक्ष काम शून्य! ग्रामस्थांनी वारंवार निवेदने दिली, अर्ज केले, बैठका घेतल्या पण सत्ताधाऱ्यांच्या टेबलावर ती पत्रं धूळखात पडली.

काम लवकरच सुरू होईल या गोड बोलांनी ग्रामस्थांना फसवले गेले. आमच्या जीवाशी खेळणारा हा रस्ता प्रत्येक निवडणुकीत विषय बनतो, पण निकाल लागल्यानंतर आमचा आवाज मूक केला जातो, असा संताप व्यक्त करत ग्रामस्थांनी लोकप्रतिनिधींवर निष्क्रियतेचा आरोप केला आहे. अलीकडेच या १५ ते १६ गावांचे ग्रामस्थ एकत्र आले आणि एकमुखी ठरावाने वहिष्कार जाहीर केला. आता नुसती आश्वासनं नाहीत, प्रत्यक्ष काम सुरू झालं तरच मतदान! अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. आगामी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत गावात कोणत्याही उमेदवाराला प्रचार करण्यास प्रवेश दिला जाणार नाही, असा निर्णय घेऊन ग्रामस्थांनी लोकशाही व्यवस्थेलाच धक्का दिला आहे.

मतदारांच्या या ऐतिहासिक बहिष्कारामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. जोपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण सुरू होत नाही, तोपर्यंत गावात कोणी येऊ नये, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या बहिष्कारामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या निष्क्रिय कारभाराचे लक्तरे सर्वांसमोर आले आहेत. ग्रामस्थ म्हणतात, आम्ही मत देतो, पण बदल काहीच दिसत नाही.आमचं आयुष्य स्वस्त आहे का? रस्ते नसले, तर विकास कसा होणार? त्यांच्या या प्रश्नांनी स्थानिक सत्ताधाऱ्यांचे मौन अधिकच बेजबाबदार वाटत आहे. लोकप्रतिनिधींच्या नाकर्तेपणाचा निषेध आणि जनतेच्या असंतोषाचा ज्वालामुखी बीड ते नाळवंडी रस्त्याच्या रूपाने पेटून उठला आहे.



आमच्या गावासाठी रस्ता नाही, तर मतदानही नाही! गेल्या अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधी आमच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत आहेत. पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीत आम्ही सर्वजण बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत आमचा रस्ता दुरुस्त होत नाही, तोपर्यंत कोणालाही आमच्या गावात प्रचार करण्याची किंवा आमचे मत मागण्याची परवानगी नाही, अशी ग्रामस्थांनी भूमिका घेतली आहे.

पान ४ वरून

## सरकारी दवाखान्यात

तो स्वच्छतेचा प्रश्न असो की, औषधांचा तूटवडा असो, आता मागील दोन दिवसांपासून जिल्हा रुग्णालयात विजेचा लपंडाव सुरू आहे जवळपास अर्धे रुग्णालय अंधारात होते. वीज पुरवठा खंडित का होतो या विषयावर रुग्णालय प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. वीज पुरवठा खंडित झाल्याने रुग्णाचे हाल होत असल्याचे दिसून आले. काही रुग्णांना तर वार्ड सोडून बाहेर येऊन बसण्या शिवाय पर्याय नव्हता रुग्णालयात जनरेटर ची सुविधा फक्त कार्यालय पुरताच आहे की काय? असा प्रश्न उपस्थित होतो. या विषयावर रुग्णालय प्रशासनाने लक्ष घालून हा प्रश्न मार्गी काढावा अशी मागणी सामान्य नागरिकातून होत आहे. तर महावितरण कंपनीने ही लक्ष देऊन येथील वीजपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

## ओबीसी मराठा वाद

उपस्थितांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केले.

यावेळी आ.संदीप क्षीरसागर म्हणाले की, माझ्या आमदारकीच्या निवडणुकीत अडचणीच्या काळात सोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना आयुष्यभर विसरणार नाही. विधानसभेच्या वेळी कार्यकर्त्यांनी माझ्यासाठी काम केलं आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांच्यासाठी काम करणार आहे. जोपर्यंत कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार नाहीत तोपर्यंत मी आराम करणार नाही. आताच्या घडीला तरी आपल्या समोर कोणीच दिसत नाही. कारण आपण रस्त्यावर उतरून काम करणारे कार्यकर्ते आहोत.त्यामुळे जनतेचा आपल्याला पाठिंबा आणि आशीर्वाद मिळतोय. आपल्या पक्षाची भूमिका ही स्पष्ट आणि ठोस आहे. जवळची माणसं सोबत असल्याने ठोस आणि ठामपणे भूमिका घेतो. येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये सर्व कार्यकर्त्यांनी ओबीसी मराठा वाद डोक्यातून काढला पाहिजे. सर्वसामान्य लोकांसाठी रस्त्यावर उतरून काम करा. राज्य सरकारच्या पॅकेज ने शेतकरी बांधव संतुष्ट नाही. सरकारला देखील ग्रामीण भागात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये पराभव दिसत असल्याने नगरपालिकेची निवडणूक ही जिल्हा परिषद आणि पंचायत समिती च्या अगोदर घेत आहेत. कार्यकर्त्यांना आवाहन करताना आ.संदीप क्षीरसागर म्हणाले की, कार्यकर्त्यांनो गुत्तेदारीसाठी निवडणुका लढू नका. अगोदरच स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये प्रशासक असल्याने नागरिकांचे कामे रखडली आहेत. लोकांच्या कामासाठी रस्त्यावर उतरून प्रश्न मार्गी लावा. ही जनता काम करणाऱ्याच्या कायम पाठीशी उभी राहते. येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत माझ्या अडचणीच्या काळात सोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना संधी देणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत विजय खेचून आणायचा आणण्यासाठी चेन पद्धतीने चालायाचे आहे. चेन पद्धतीने आपण मोठ्या फरकाने विजय मिळवू असा विश्वास देखील दिला. कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण ताकदीने निवडणूक लढवून जिल्हा परिषद व पंचायत समिती ताब्यात आणण्याचा संकल्प केला आहे. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राज्याचे प्रवक्ते शिवराज बांगर, वैजनाथ तांदळे यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## राष्ट्रवादीच्या नेत्याचा

कुटुंबाला राष्ट्रवादीचे नेते मोहन जगताप शनिवारी भेटायला आले होते. त्यांनी कुटुंबाच्या समोर थेट मुख्यमंत्री फडणवीस यांना फोन लावला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी घटनेचा मास्टरमाइंड शोधण्याचे आश्वासन पीडित कुटुंबाला दिले.तसेच पीडितेच्या तक्रारीवर चौकशी न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची सुद्धा चौकशी होईल आणि जे कोणी या प्रकरणात असेल त्यांना सह आरोपी करून त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी देवेंद्र फडणीस यांनी पीडित कुटुंबाला फोनवरून दिले.

पीडित डॉक्टर महिलेने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या शारीरिक आणि मानसिक छळ होत असल्याचे वरिष्ठांना वारंवार कळविले होते. परंतु तिच्या तक्रारीची दखल न घेतल्याने तिने टोकाचे पाऊल उचलले. तिने तळहातावर लिहिल्यानुसार पोलीस उपनिरीक्षक बदाने याने वारंवार अत्याचार केले आणि बनकर याने तिचा मानसिक छळ केला. प्रशांत बनकर आणि पीडितेची चांगली मैत्री होती. प्रशांतच्या वडिलांच्या फ्लॅटमध्येच पीडिता राहायला होती. मात्र काही दिवसांपूर्वीच प्रशांत आणि पीडितेमध्ये जोरदार भांडण झाले होते.

फलटण उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य विभागाचे आणि पोलिसांचे पथक दाखल झाले आहे. डॉक्टर अंशुमन धुमाळ आणि इतर कर्मचाऱ्यांची पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. पोलिसांकडून परिचारिकांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. सातारा जिल्हा शल्य चिकित्सक देखील उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाले आहेत.

## माझ्या भावाला

प्रकरणावर भाष्य करताना आरोपी प्रशांत बनकरचा भाऊ म्हणाला, डॉक्टरच माझ्या भावाला जास्त फोन करत होत्या. त्यांच्यात काय बोलणं व्हायचं, याचा तपास व्हायला पाहिजे. माझ्या भावाला अडकवलं जातंय, असं मला वाटतंय. तो घरी फार नसतो. तो अधून मधून येत असतो. आता दिवाळीला आला होता. त्यांच्यात काय चॅटींग व्हायचं. यातून कोण कुणाला जास्त त्रास देत होतं, याचा तपास व्हावा.

या घटनेबाबत अधिक माहिती देताना प्रशांतची बहीण म्हणाली की, मयत डॉक्टर आम्हाला फॅमिली मेंबरसारख्या होत्या. आम्हाला बहिणीसारख्या होत्या. त्या नेहमी घरी यायच्या. आमच्याशी बोलायच्या. जॉबवर सुरू असलेल्या त्रासाबद्दल सांगायच्या. यातून त्यांना मानसिक त्रास सुरू असल्याचं दिसून यायचं. माझ्या भावाची आणि डॉक्टरची याच महिन्यात ओळख झाली होती. तिने १५ दिवसांपूर्वी भावाला प्रपोज केलं होतं. त्या माझ्या भावाला दादाही म्हणत होती. त्यामुळे माझ्या भावाने तिला समजावून सांगितलं होतं. त्यानंतर तो विषय तिथेच क्लोज झाला होता. दोघंही संपर्कात नव्हते.

लक्ष्मीपूजनच्या दिवशी आम्ही एकत्र सण साजरा केला. यावेळी माझ्या भावाने डॉक्टरचे काही फोटो काढले होते. फोटो व्यवस्थित न आल्याने दोघांमध्ये किरकोळ वाद झाला होता. माझा भाऊ डॉक्टरवर ओरडला होता. पण त्यानंतर तो सॉरी बोलला होता. दरम्यान, माझ्या भावाचा मित्र आजारी असल्याने तो मित्राच्या घरी गेला होता. तेव्हा डॉक्टरने माझ्या भावाला कॉल वर कॉल केले. अनेकदा कॉल करून टॉर्चर केलं. तुम्हाला माझी काळजी नाही, असं म्हणत ती ब्लॅकमेल करत होती, असंही प्रशांत बनकरच्या बहिणीने म्हटलं आहे.

## शिरसाटांनी करोडोंची

याप्रकरणी रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्र्यांकडे तब्बल १२ हजार पानांचे पुरावे देखील पाठवले होते. परंतु मागील २ महिन्यात याप्रकरणात कोणतीच कारवाई झालेली नव्हती. (ठेहळीं झरुरी - श्रश्रशसरींळेप`प`िरपक्षरू डहळीरीं)

रोहित पवार यांनी आरोप केलेल्या बिवलकर प्रकरणात तथ्य असून सिडकोची तब्बल १४०० कोटींची जमीन हडप केल्याची बाब खुद्द वनविभागानेच कबूल केल्याचं समोर आलं आहे. या प्रकरणी बिवलकर यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी पनवेल आणि उरण पोलीस ठाण्याला वन विभागाच्यावतीने पत्र देखील देण्यात आले आहे. परंतु आद्याप पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केलेला नाही.

१) पेन आणि उरण परिक्षेत्रातील आपटा, उलवे, सोनखार, तरघर, दापोली, कोपर, पारगांव डुंगी गावातील ६१ हजार ७५० चौ मी क्षेत्रफळाचे १२ भूखंड चुकीच्या पद्धतीने वाटप करण्यात आले आहेत

२) नगरविकास विभागाच्या मदतीने सिडकोने या जमीनीचे वाटप केले आहे

३) सदर जमीन वनविभागाची आहे मात्र कागदपत्रात फेरफार करण्यात आला आहे

४) उरण परिक्षेत्रात १४०० कोटी, रसायनी परिसरात १४ कोटी रुपये बाजारमूल्य असलेली जमीन बळकावली आहे

५) जमीन बळकावणारे बिवलकर आणि त्यांनी ज्यांना जमीन दिली त्यांच्यावर फसवणुकीचा तत्काळ गुन्हा दाखल करणे

वनविभागाच्या पत्राची बाब समोर आल्यानंतर रोहित पवार यांनी पुन्हा एकदा संजय सिरसाठ यांच्या राजीनाम्याची मागणी ट्विट करत मुख्यमंत्र्यांकडे केली. याबाबत शिरसाट यांना विचारणा केली असता त्यांनी रोहित पवार बेछुट आरोप करत असून त्यांना देखील आता संजय राऊत यांच्यासारखी वायफळ बोलण्याची सवय लागली असल्याचं म्हटलं आहे. तसेच आपण लवकरच निवृत्त होण्याचे संकेत दिले आहेत

रोहित पवार यांनी संजय सिरसाठ यांच्या पत्रकार परिषदेनंतर पुन्हा एकदा निशाणा साधताना वय पुढं करुन पळ काढू नका सरकारची ५ हजार कोटी रुपयांची जमीन खाजगी लोकांच्या घशात घातल्याचा इंच इंच हिशोब तुम्हाला द्यावाच लागेल आता सुट्टी नाही आशा आशयाचे ट्विट केलं आहे तर अंबादास दानवे यांनी देशासोबत गद्दारी करणाऱ्यांना कशाप्रकारे जमीन बक्षीस म्हणून सरकारने दिली हे समोर आणले आहेत.

मागील २ महिन्यांपासून सातत्याने पत्रकार परिषदेच्या माध्यमातून रोहित पवार यांनी सिडको, नगरविकास विभाग यांनी केलेल्या चुकीच्या बाबी समोर आणल्या आहेत. परंतु आद्याप या प्रकरणात कोणावरही कारवाई झालेली नाही. वनविभागाने देखील झालेल्या भ्रष्टाचाराबाबत पोलीस प्रशासनाला पत्र लिहिले आहे परंतु तरीदेखील कारवाई झाली नसल्यामुळे पोलिसांवर कोणाचा दबाव तर नाही ना अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

## कंत्राटदाराकडून डिफेंडर

सर्वांना पडला होता. काही आमदारांनी याकडे लक्ष वेधले होते. एक कंत्राटदाराने ही गाडी भेट दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. मात्र एका कंत्राटदाराने ती गाडी आपली असल्याचा सांगून दीड कोटी रुपये यासाठी आपण कर्ज काढले असल्याचे सांगितले आहे.

आमदार गायकवाड यांच्याशी आपले मैत्रीपूर्ण संबंध आहे. त्यांना गाड्याचा छंद आहे. त्यांच्याकडे अनेक गाड्यासुद्धा आहेत. डिफेंडर गाडी बघून त्यांची उत्सुकता वाढली. त्यांनी ती गाडी काही दिवस चालवायला मागून घेतली असल्याचा दावा संबंधित कंत्राटदाराने केला होता. बँकेकडून कर्जाची कागदपत्रेसुद्धा त्यांनी दाखवली होती. मात्र यानंतरही यावर कोणाचा विश्वास बसलेला नाही.

हर्षवर्धन सपकाळ यांनी पुन्हा एकदा बुलडाण्यात गायकवाड यांच्या गाडीचा उल्लेख करून या विषयाला पुन्हा फोडणी दिली आहे. त्यांनी एकूण २१ आमदारांना एका कंत्राटदाराने गाड्या दिला असल्याचा आरोप केला. हे सर्व आपण लवकरच उघडकीस आणणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आमदारांकडे असलेल्या डिफेंडर गाड्यांचा मुद्दा तापणार असल्याचे दिसून येते.

सपकाळ हे बुलडाणा येथे पत्रकारांसोबत बोलत होते. दुसऱ्याच्या गाडीवर कोणी आमदाराचा फलक लावत नाही. मी स्वतः आमदार होतो. मात्र दुसऱ्यांच्या गाडीवर आपल्या नावाचा फलक लावून कधी फिरलो नाही, असे सांगून त्यांनी ही गाडी आमदार गायकवाड यांचीच असल्याचा दावा केला. आता डिफेंडर गाड्यांचे गिफ्ट घेतलेले ते २१ आमदार आणि एवढ्या महागड्या गाड्या देणारा कंत्राटदार कोण ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आमदार संजय गायकवाड यांनी मात्र सपकाळांचे आरोप खोडून काढले. गाडीचा मालक एक कंत्राटदार आहे हे त्यांनी मान्य केले. त्यानेच ही गाडी स्वतःची असल्याचे सांगितले आहे. गाडीचे कागदपत्रे आणि बँकेच्या कर्जाचे कागदपत्राचे पुरावे त्याने जाहीर केले आहे. त्यामुळे हा विषय संपला आहे. सपकाळ हे जनाधार नसलेले नेते आहेत. त्यांनी आमच्याकडे लक्ष देण्यापेक्षा काँग्रेसच्या आमदारांकडे महागड्या गाड्या कुठून आल्या याची विचारणा करावी, असा सल्लाही गायकवाड यांनी हर्षवर्धन सपकाळ यांना दिला.

## दोन महिला अधिकारी

कोणाकडे असणार, यावरून हा वाद निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. नव्या नियुक्ती होईपर्यंत, नवी मुंबईच्या पोस्टमास्टर जनरल सुचिता जोशी यांच्याकडे नागपूरचा संपूर्ण प्रभार सोपवण्यात आला आहे. ही तात्पुरती व्यवस्था असून, लवकरच या पदावर कायमस्वरूपी अधिकारी नेमण्यात येणार आहे. सरकारी कार्यक्रमातच अधिकाऱ्यांमधील अंतर्गत वाद समोर आल्याने या घटनेची दखल घेण्यात आली आहे.

## प्रभाग क्रं. २३ च्या

येत आहे. दोन दिवसापुर्वीच औरंगाबाद येथे झालेल्या पक्षाच्या बैठकीमध्ये बीड जिल्ह्यात सर्व प्रथम सलाम शेठ यांच्या उमेदवारीवर पक्षश्रेष्ठीने शिक्कामोर्तब करून सलामशेठ यांना या प्रभागातून निवडूक लढविण्याचे आदेशित केले आहे. पक्षाचे आदेश मिळताच सलाम शेठ यांनी या प्रभागात गाठी भेटीला सुरूवात केली असून सर्वांशी असलेले मैत्रीपुर्ण संबंध प्रत्येकाच्या मनात घरकरून ठेवलेले सलामशेठ.... लहान असो की वृध्द प्रत्येकांशी प्रेमाने बोलणारे आणि सर्वांना मान देवूनच आदर पुर्वक बोलणारे सलामशेठ सारखी व्यक्ती या प्रभागाला मिळणार आहे. या पुर्वीही या प्रभागातून एमआयएम पक्षाचे दोन नगरसेवक भरघोस मतांनी निवडून आलेले आहेत. सलामशेठ यांनी केलेल्या कामे त्यांनी जनतेला बोलवून दाखविले नाही. इतरांचा मात्र असा स्वभाव आहे की मी हे केले अन् मी ते केले... अशी थापेबाजी करून मतदाराना झुलवित ठेवण्याचे काम सलामशेठ यांनी कधीच केले नाही. सलामशेठची उमेदवारी पक्की झाल्यानंतर मी-मी म्हणारेही त्या प्रभागातून इतर प्रभागात पळ काढतांना दिसून येत असून मागच्या निवडणूकीप्रमाणेच आपल्याला याही निवडणुकीत मतदारांकडून पटकी मिळू नये या भितीपोटी त्यांनी आपला रस्ता दुसऱ्या प्रभागात वळविला असल्याचे चित्र दिसुन येत असून सलामशेठला सर्वच जाती धर्माचे लोक आदरानी मानतात. अत्यंत शिस्तबध्द आणि स्वभवाने मयाळू असलेल्या सलामशेठ यांना या प्रभागात चांगला प्रतिसाद मिळत असून निवडणूकीत सलामशेठ यांचा विजय जवळपास निश्चित असल्याचे प्रभागात बोलले जात आहे.